# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

**क्र...1561/शि.वि. / 2014** **दि. 7/01/2014.**

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा, म.न.पा., नागपूर.

**विषय :– गणतंत्र दिवसाच्या पूर्व संध्याला दि. 25 जानेवारी 2014 रोजी चित्रकला प्रतियोगिता आयोजनाबाबत.**

**संदर्भ :– सचिव, भगतसिंह विचार मंच, नागपूर यांचे दि. 07 / 01 / 2014 चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शहीद भगतसिंग विचार मंच, नागपूर यांनी आजादी के आदोंलन / स्वातंत्र्याचे आदोंलन (Freedom Strugle) या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा गणतंत्र दिवसाच्या पूर्व संधेला दि. 25 जानेवारी 2014 रोजी दुपारी 2.00 ते 4.00 या वेळेत राष्ट्रभाषा भवन, आंध्र असोशिएशन च्या बाजूला सिताबर्डी, नागपूर येथे होणार आहे. या स्पर्धेला स्पर्धकांना दुपारी 1.30 वाजेपर्यंत स्पर्धेच्या ठिकाणी हजर व्हायचे आहे. चित्रकला स्पर्धा दोन गटात होणार असून गट 1) वर्ग 5 ते 8, गट 2) वर्ग 9 ते 12 राहील. ही प्रतियोगिता निःशुल्क राहणार असून स्पर्धकांना ड्रॉईंग शीट, आयोजकामार्फत पुरविण्यात येईल. अन्य साहित्य जसे पेन्सिल, रंग इत्यादी स्पर्धकांना स्वतः आणावे लागेल. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, व्दितीय व तृतीय तसेच 10 सांत्वना पुरस्कार देण्यात येणार आहे. आपल्या शाळेतील उपरोक्त गटातील इच्छूक विद्यार्थ्यांचे नावे 20 जानेवारी 2014 पर्यंत शहीद भगतसिंग विचार मंच, विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेंबर्स , सिताबर्डी , नागपूर येथे देण्यात यावी. अधिक माहितीकरीता दुरध्वनी क्र. (0712) 2526442, 9422440266 वर संपर्क साधावा.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर.**

**प्रतिलिपी :–**

1) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर.
2) अध्यक्ष, सचिव, भगतसिंह विचार मंच, विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर.